# आकाशवाणी नागपूर,
# (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# रविवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२५

**ठळक बातम्या**

1. **ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील ८०० एकर परिसराचं होणार पुनरुज्जीवन.**
2. **सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आज होणार सेवानिवृत्त: न्यायमूर्ती सूर्यकांत असतील नवे सरन्यायाधीश.**
3. **वैचारिक कक्षा रुंदावण्यासाठी पुस्तक महोत्सवाचं आयोजन महत्त्वपूर्ण असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन.**
4. **दृष्टिहीन महिलांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताला जेतेपद.**

**आणि**

5. **लक्ष्य सेन यानं पटकावलं ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन पुरुष एकेरीचं अजिंक्यपद.**

-------------

ताडोबा व्याघ्र प्रकल्प

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील ८०० एकर जागेचा पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाला झिरोधा कंपनी आणि रेन मॅटर फाऊंडेशन सामाजिक उत्तरदायित्वातून सहकार्य करणार आहेत. महाराष्ट्रातील हा पहिलाच प्रकल्प ताडोबामध्ये राबविण्यात येणार असून यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाबरोबरच फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्या सहकार्यानं झिरोधा आणि रेनमॅटर फाऊंडेशन ही संस्था काम करणार आहे. यासाठी सुमारे १०० कोटी रुपयांचा झिरोधा रिवाइल्डिंग फंड हा विशेष निधी तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पासंदर्भातील औपचारिक घोषणा लवकरच होणार आहे. हा पर्यावरणपूरक उपक्रम केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर देशातील कॉर्पोरेट क्षेत्रासाठीही एक आदर्श ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

सरन्यायाधीश निवृत्ती

देशाचे विद्यमान सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई आज सेवानिवृत्त होत आहेत. आज संध्याकाळी गवई आपल्या पदावरून मुक्त होतील आणि त्यानंतर न्यायमूर्ती सूर्यकांत पदभार स्वीकारतील. न्यायमूर्ती सूर्यकांत उद्या देशाचे ५३ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतील. ते पुढचे १५ महिने देशाचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहतील आणि वयाची ६५ वर्षे पूर्ण झाल्यावर ९ फेब्रुवारी २०२७ ला निवृत्त होतील.

झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल

सांस्कृतिक ठेवा जपण्याचं काम पुस्तकांच्या माध्यमातून होत असतं. नागपूर पुस्तक महोत्सवांतर्गत होत असलेल्या झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हलच्या माध्यमातून प्रगल्भता येऊन जाणिवा विस्तारित होतील. त्यातून वैचारिक कक्षा रुंदावून प्रगल्भ व्यक्तिमत्व तयार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपूर इथं व्यक्त केला. नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानं आयोजित नागपूर बुक फेस्टिव्हल अंतर्गत चार दिवसीय 'झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल'चं उद्घाटन आज फडणवीस यांच्या हस्ते झालं. 23 आणि 24 तसंच 29 आणि 30 नोव्हेंबरदरम्यान हा साहित्य महोत्सव रेशीमबाग मैदानावर होत आहे. या महोत्सवात 300 हून अधिक प्रकाशक आणि 15 लाखांहून अधिक पुस्तकं उपलब्ध आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस

दरम्यान, आगामी निवडणुकीत महायुतीचा विजय होईल, असा विश्वास त्यांनी वार्ताहरांशी बोलताना व्यक्त केला.

***महाराष्ट्रात आमच्या महायुतीला म्हणजे आम्ही जे तीनही पक्ष आहोत, कुठे सोबत लढत आहोत, कुठे वेगळ लढत आहोत, पण एकूण आमच्या तीन पक्षांना महाराष्ट्राची जनता निवडून देईल आणि त्यानंतर महाराष्ट्राचा नागरी भागाचा चांगला विकास आम्ही करू.***

कामगार कायदे

केंद्र शासनाच्या वतीनं देशातील ४० कोटी कामगारांना केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक कामगाराचा सन्मान करणारी कामगार संहिता लागू केली असून या ऐतिहासिक

निर्णयाचं सर्व स्तरातून स्वागत होत आहे. सर्व कामगारांना वेळेवर किमान वेतनाची हमी, तरुणांसाठी नियुक्ती पत्रांची हमी, महिलांसाठी समान वेतन आणि आदराची हमी या निर्णयामुळे प्राप्त झाली असून यामुळे रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत. कामगारांच्या सामाजिक सुरक्षेची हमी आणि ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या कामगारांसाठी मोफत वार्षिक आरोग्य तपासणीची हमी कामगार संहितेच्या माध्यमातून मिळणार असल्यानं कामगारांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल, असं मत  बुलढाणा जिल्ह्यातील औद्योगिक वसाहत खामगावचे कामगार युनियन नेता गजानन राऊत यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केलं.

***यामध्ये कामगारांचा भरपूर फायदा होणार आहे. सर्वात महत्वाचं आरोग्यासाठी फार महत्वाचा निर्णय केंद्र सरकारने त्याच्या मध्ये घेतला. आता खामगाव मधेच १० हजार कामगार जवळपास काम करतात आणि जिल्ह्यामध्ये जवळपास ५० हजाराच्यावर कामगार काम करतात. याच्या मध्ये छोटे मोठे कारखानेसुद्धा समाविष्ट आहेत किंवा गावातील एखादी मोठी संस्था असेल १०-२० कामगार काम करतात, त्यांना लागून आहे. अस्थायी कामगारांनाही लागू अस्थायी कामगार बांधकाम, कामगार कोणी असो जे कंटिन्यू काम आहे त्यांना सगळ्यांना हा कायदा लागू आहे.***

गोवारी शहीद दिन

नागपूर इथं 23 नोव्हेंबर 1994 रोजी हिवाळी अधिवेशना दरम्यान आपल्या मागण्यासाठी आंदोलन करीत असतांना झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये 114 आदिवासी गोवारी शहीद झाले होते. या घटनेच्या स्मृती दिनानिमित्त गोवारी समाज बांधवाच्या विविध संघटनांच्या वतीनं झिरो माइल जवळील गोवारी शहीद स्मारक इथं त्यांना आज अभिवादन करण्यात आलं. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गोवारी बांधव शहीद झालेल्या आपल्या बांधवाना अभिवादन करण्यासाठी नागपुरात दाखल झाले आहेत.

कॉप 30-ब्राझील

ब्राझीलमधल्या बेलेम इथं सुरू असलेल्या संयुक्त राष्ट्रांची हवामान परिषद ‘कॉप ३०’ मध्ये अखेरीस हवामान कराराच्या मसुद्यावर सर्व जागतिक नेत्यांचं एकमत झालं आहे. गेले दोन आठवडे सुरू असलेल्या या परिषदेच्या समाप्तीनंतरही काल रात्रभर लांबलेल्या चर्चेनंतर हा मसुदा तयार झाला असला, तरीही त्यात जीवाष्म इंधनाचा

वापर कमी करण्यासाठी पुरेशा उपाययोजना मात्र समाविष्ट नाहीत. हवामानसंबंधित व्यापार नियमांचा आढावा घेण्याचं तसंच विकसित देशांनी विकसनशील देशांना नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी पुरेसा वित्तपुरवठा करण्याचं आवाहन या मसुद्यात करण्यात आलं आहे.

इफ्फी

गोव्यात पणजी इथं सुरू असलेल्या ५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव इफ्फीच्या आजच्या चौथ्या दिवशी जगभरातील विविध चित्रपट तसंच कार्यक्रमांची मेजवानी प्रेक्षकांना मिळत आहे. दरवर्षीप्रमाणं यावर्षीही इफ्फी महोत्सवात ICFT UNESCO गांधी पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. अनुपम खेर यांचा 'तन्वी द ग्रेट' हा सिनेमा या पुरस्कारासाठीच्या स्पर्धेत आहे.

नेत्रहीन क्रिकेट

भारतानं आज श्रीलंकेत कोलंबो इथं झालेल्या पहिल्या दृष्टिहीन महिला टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद पटकावलं. भारतानं नेपाळचा ७ खेळाडू राखून पराभव केला आणि विश्वजेतेपदाला गवसणी घातली. या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. नेपाळला निर्धारित २० षटकांत ५ खेळाडू गमावून ११४ धावा करता आल्या. नेपाळनं विजयासाठी दिलेल्या ११५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना फुला सरेन आणि करुणा यांनी अर्धशतकी भागिदारी करत भारताला विजयाच्या समीप नेलं. तेराव्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर फुला सरेन हिनं विजयी चौकार मारून भारताला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.

बॅडमिंटन

भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन यानं सिडनी इथं झालेल्या ऑस्ट्रेलियन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीचं अजिंक्यपद पटकावलं आहे. आज सकाळी न्यु साउथ वेल्स इथं झालेल्या अंतिम सामन्यात लक्ष्यनं जपानच्या युशी तनाका याचा २१-१५, २१-११ असा सरळ सेटमध्ये पराभव करत निर्विवाद वर्चस्व दाखवत यश मिळवलं.

कसोटी क्रिकेट

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात गुवाहाटी इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेनं आपला पहिला डाव ६ बाद २४७ धावांवरून पुढं सुरू केला आणि ४८९ धावांवर डाव घोषित केला. आज दिवसाअखेर भारत फलंदाजी करत असून आजचा खेळ संपला, तेव्हा भारताच्या ६ षटकांत ९ धावा झाल्या होत्या.

श्री गुरू तेग बहादुर साहिब

नांदेड इथं श्री सचखंड गुरुद्वारा संस्थानतर्फे श्री गुरू तेग बहादुर साहिबजी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी समागम निमित्त आजपासून २५ नोव्हेंबरपर्यंत विविध कार्यक्रम होणार आहेत. हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब यांनी मानवता- धर्म रक्षणासाठी दिलेल्या बलिदानाचं स्मरण करण्यासाठी आयोजित कार्यक्रमांमध्ये तख्त साहिबमध्ये विशेष कीर्तन दरबार तसंच चर्चासत्र, आणि ‘सर्व धर्म संमेलन’ देखील आयोजित करण्यात आलं असल्याचं आमच्या प्रतिनिधीनं सांगितलं आहे.

नक्षल समर्पण

तेलंगणाच्या हैदराबाद इथं ३७ नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं असून ते मुख्य प्रवाहात सामील झाले आहेत. नक्षलींच्या राज्य समितीच्या तीन वरिष्ठ सदस्यांसह २५ महिलांचा यात समावेश आहे. या सर्वांनी हैदराबाद इथं पोलिसांकडे आपल्याकडील शस्त्र सुपूर्द केली. समर्पणानंतर राज्य समिती सदस्यांना प्रत्येकी वीस लाख रुपये दिले गेले.

संविधान दिंडी

संविधान अमृत महोत्सवी वर्ष संपूर्ण भारतभर मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. त्यानिमित्त राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीनं बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ७:३० वाजता संविधान दिंडीचं आयोजन करण्यात आलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉ ते संविधान चौक अशी संविधान दिंडी काढली जाणार आहे. संविधान चौक इथं दिंडीचा समारोप होणार असून या ठिकाणी संविधान प्रास्ताविकेचं सामूहिक वाचन केलं जाणार आहे.

हवामान

हवामान! विदर्भात गेल्या दोन दिवसांपासून थंडीची लाट काहीशी ओसरली असून किमान तापमानात सर्वत्र वाढ झाली आहे. आज विदर्भात वाशीम इथं १२ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सिअस इतक्या सर्वाधिक किमान तापमानाची नोंद करण्यात आली. नागपूर इथं १४ पूर्णांक ३ दशांश अंश  सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली.

*****